# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कर आकारणी विभाग

दर पत्रक नोटीस क्र. २ / २०२३

## निविदे कामी दर पत्रक मागविणे बाबत.

| | |
|---|---|
| कामाचे नांव : | मिळकतकराचे कोरे देयक एका बाजुस तीन रंगात आणि दुसऱ्या बाजुस एका रंगात छपाई करणे तसेच नोटीसा एक बाजु एका रंगात छपाई करुन ब्लॉक निहाय बजावणी करणे व मिळकतनिहाय छायाचित्र करुन, मनपाने दिलेल्या कार्यप्रणाली मध्ये समाविष्ठ करणे. |
| कामाची मुदत | ५ वर्ष |
| स्पष्टीकरण | नाशिक महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागाचे वरिल प्रमाणे कामकाज करणेसाठी निविदा मागविण्याचे आहे. त्याकामी दर उपलब्ध नसल्याने बाजारभाव उपलब्ध करणेकामी खालील प्रमाणे कामाचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेऊन विहीत मुदतीत कर पत्रके मागविण्यात येत आहेत. |
| कामाचे स्वरुप | **मालमत्ता कराचे देयके व नोटीसा छपाई करुन वितरीत करणे :** मिळकतकराचे कोरे देयक एका बाजुस तीन रंगात आणि दुसऱ्या बाजुस एका रंगात छपाई करणे तसेच नोटीसा एक बाजु एका रंगात छपाई करणे.<br>यशस्वी मक्तेदाराने, मा. आयुक्त, मनपा नाशिक यांचेकडुन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडून दर वर्षी उक्त देयकांचा व नोटीसांचा मसुदा व नमुना मंजुर करुन घ्यावा. त्या मंजुर नमुन्यानुसार आणि स्पेशिफिकेशन प्रमाणे कोरी देयके व नोटीसा छपाई करणे आणि तद्नंतर मनपाने पुरविलेल्या संगणकीय माहितीनुसार (डाटानुसार) देयके व नोटीसांवर मागणी व इतर अनुषंगीक माहिती मुद्रीत करुन वितरीत करणे.<br>१. यशस्वी मक्तेदाराने प्रिंटींग कामासाठी लागणारे सर्व प्रकारचे कागद भारतीय मानांकन Writing and Printing Paper Specification (४ th Revision) Writing Paper IS : १८४८-१९९१ with amendment No. २ & ३ Oct. २०००, Art Card-IS ४६५८-१९८८, Kraft paper - IS : १३९७-१९९० नुसार व दिलेल्या स्पेसिफिकेशन नुसार “ ए ” ग्रेड मिलचा पेपर तसेच रंगाची गुणवत्ता उकृष्ट प्रतिची व दिलेले डिझाईन व प्रिटींगचा मजकुराकरिता लागणारी शाईची गुणवत्ता उत्तम दर्जाची वापरावी.<br>२. कागदाचा नमुना, नमुद GSM च्या तुलनेत पुढील प्रमाणे किमान तफावतीच्या विहीत मर्यादेतील नमुनेच विचारात घेतले जातील.<br><table><tr><th>पेपरचा प्रकार</th><th>तफावतीची विहीत मर्यादा</th></tr><tr><td>कॉम्पुटर पेपर/मॅपलिथो पेपर “B” ग्रेड मिलचा पेपर ७० GSM</td><td>(+) २.५% ते (-) २.५%</td></tr></table>३. यशस्वी मक्तेदारास मिळकतीची देयके व नोटीसा छपाईकामी वापरावयाच्या कागदाचा गुणवत्ता तपासणी अहवाल शासन मान्यता प्राप्त लॅब यांचेकडुन प्राप्त करुन सादर करावा. उक्त तपासणी करीता येणारा खर्च यशस्वी मक्तेदार यांनी करावा.<br>4. यशस्वी मक्तेदाराने छपाई करून पुरवठा केलेल्या मालाचे नमुने GSM तपासणी करणे महानगरपलिकेस आवश्यक वाटल्यास गोपनिय /उघड तपासणी करता प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येतील. त्यासाठी छापील साहित्याचे नमुने साक्षांकीत करून देणे आवश्यक राहिल. सदरचे नमुने तपासणीचा खर्च फी मक्तेदार अदा करेल.<br>५. पुढील आर्थिक वर्षाची मागणीचे देयके छपाई करतांना चालु आर्थिक वर्षांचे सर्व प्रथम संपुर्ण भरणा केलेल्या मिळकतधारक/ भोगवटादार इत्यादींची माहितीचा डेटा पुरविण्यात येईल त्यानुसार पुरविण्यात आलेल्या मिळकतींचे मनपाने निश्चित केलेल्या मुदतीत देयकांची ब्लॉक निहाय वाटप क्रमवारीनुसार छपाई करुन वाटप करणे.<br>६. वेळोवेळी मालमत्ता कराचे थकबाकीदार यांना द्यायवयाची नोटीस तयार करुन बजावणी करणे, नविन कर निर्धारण/वाढीव बांधकाम/भाडेतत्वारील वापर/वापरात बदल इ. नोटीसा तयार करुन बजावणी करणे. |

| | |
|---|---|
| | ७. ब्लॉक निहाय वितरीत केलेल्या/ बजावणी केलेल्या देयकांच्या व नोटीसांच्या स्थळप्रती संबंधीत ब्लॉकचे मनपा कर्मचारी/ कर निरिक्षक यांचेकडे जमा करावी व सदरच्या स्थळप्रती जमा केले बाबत पोहोच घ्यावी. |
| अंदाजे ५ वर्षाची मिळकत संख्या २९५४५१० नुसार मालमत्ता कराचे देयके संख्या २९५४५१० व मालमत्ता कराचे नोटीसा १४७७२६०. (प्रथम वर्षात - ४८३९४१ मिळकत संख्या त्यामध्ये पुढील ४ वर्षाकरीता १० टक्के वाढ विचारात घेऊन एकुण मिळकत संख्या व नोटीस संख्या) | |
| मिळकत संख्या निहाय दर र.रु (अंकी व अक्षरी) | |

वरिल प्रमाणे कामकाजाचे वाजवी दरपत्रके उप आयुक्त (कर), कर आकारणी विभाग, तळ मजला राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक यांचे कार्यालयात दि. १४ / १२ / २०२३ रोजी सायंकाळी ५.०० पावेतो सादर करावी.

Sd/xxx

उपआयुक्त (कर)

नाशिक महानगरपालिका, नाशिक